नागरिकशास्त्र

(संसदीय शासनपद्धती)

अनुक्रमणिका

क्र.	पाठाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१.	संसदीय शासन पद्धतीची ओळख	६८
२.	भारताची संसद	७१
३.	केंद्रीय कार्यकारी मंडळ	७५
४.	भारतातील न्यायव्यवस्था	७९
५.	राज्यशासन	८३
६.	नोकरशाही	८६

अध्ययन निष्पत्ती

सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया	अध्ययन निष्पत्ती
वैयक्तिकरीत्या / अध्ययनार्थ्यास जोडीने / गटामध्ये अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे. • संविधान, संसद, न्यायसंस्था, सीमांतीकरण किंवा समासीकरण (marginalization) यांसारख्या संकल्पनांवरील चर्चांत सहभागी होणे. • भारतीय संविधानाचे महत्त्व, प्रास्ताविका, संसदीय शासनपद्धती, सत्तेचे विभाजन, संघराज्यवाद यांवर रेखाचित्र व चित्रांसह भित्तिपत्रके बनवणे आणि लेखी/तोंडी सादरीकरण करणे. • वर्गात/शाळेत/घरात/समाजात स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे कशी आचरली जातात यावर वादविवाद करणे. • राज्याच्या/केंद्रशासित प्रदेशाच्या लोकसभा मतदारसंघांच्या नकाशाचे निरीक्षण करणे. • बालसंसद व अभिरूप आचारसंहितेसह अभिरूप निवडणुकांचे आयोजन करणे. • आपल्या परिसरातील/शेजारील नोंदणीकृत मतदारांची यादी तयार करणे. • आपल्या परिसरात मतदानाचे महत्त्व यावर जागृती अभियानाचे आयोजन करणे. • आपल्या मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी हाती घेतलेल्या सार्वजनिक कामांविषयी जाणून घेणे. • प्राथमिक माहिती अहवाल (FIR) मधील आशयाची तपासणी करणे. • दावेदारांना न्याय मिळण्यातील न्यायाधीशांची भूमिका यावर विस्तृत व चिकित्सक लेखनाच्या माध्यमातून स्वमत अभिव्यक्तीची संधी देणे. • विशेषतः स्त्रिया, अनुसूचित जाती व जमाती, भटके व विमुक्त, धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक, दिव्यांग, विशेष गरजा असणारी बालके, इतर वंचित गट यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन, संरक्षण व प्रचार, यांवर गटचर्चेचे आयोजन करणे. • बालकामगार, बालहक्क व भारतातील फौजदारी न्यायव्यवस्था यांवरील भूमिकापालन. • सार्वजनिक सुविधा व पाण्याची, आरोग्य सोईची, विजेच्या उपलब्धतेत असणारी विषमता यांवर सहाध्यायींबरोबर अनुभवांचे आदान-प्रदान करण्याची संधी देणे. • सार्वजनिक सुविधा पुरवण्यास शासन कसे जबाबदार आहे, यावर वादविवादाचे आयोजन करणे.	**अध्ययनार्थी** 08.73H.14 भारताच्या संविधानाच्या संदर्भात आपल्या प्रदेशातील सामाजिक आणि राजकीय समस्यांचा अन्वयार्थ लावतात. 08.73H.15 घटक राज्यशासन व केंद्रशासन यांत फरक करतात. 08.73H.16 लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेचे वर्णन करतात. 08.73H.17 राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या लोकसभेच्या मतदारसंघ नकाशात स्वतःच्या मतदार संघाचे स्थान निश्चित करून स्थानिक लोकप्रतिनिधींची नावे लिहितात. 08.73H.18 कायद्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेचे वर्णन करतात. (उदा., घरगुती हिंसाचारापासून संरक्षण देणारा कायदा, माहितीच्या अधिकाराचा कायदा, शिक्षणाच्या हक्काचा कायदा, इत्यादी) 08.73H.19 काही महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय सांगून त्याआधारे भारतातील न्यायालयीन व्यवस्थेचे कार्य स्पष्ट करतात. 08.73H.20 'प्रथम माहिती अहवाल' कसा दाखल करावा याचे प्रात्यक्षिक दाखवतात. 08.73H.21 आपल्या प्रदेशातील दुर्बल समाजघटकांना परिघाबाहेर का राहावे लागते त्या कारणांचे व परिणामांचे विश्लेषण करतात. 08.73H.22 पाणी, सार्वजनिक स्वच्छता, रस्ते, वीज इत्यादी सार्वजनिक सुविधा पुरवण्यातील शासनाची भूमिका ओळखतात व या सेवांच्या उपलब्धतेची दखल घेतात. 08.73H.23 महाराष्ट्रातील शासनयंत्रणेचे स्वरूप स्पष्ट करतात.